**पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,**

**पिंपरी - ४११ ०१८**

**जाहिरात क्रमांक - ३८७**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागाच्या कायम आस्थापनेवरील गट 'अ' व गट 'ब' संवर्गातील खाली नमूद केलेप्रमाणे रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी पात्र असलेल्या उमेदवारांकडून Online पध्दतीने अर्ज www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर मागविण्यात येत आहेत.

1. Online अर्ज स्वीकारण्याचा कालावधी दि. ०६/०१/२०१४ **रोजी सकाळी १०.०० वा.** पासून ते दि. १८/०१/२०१४ रोजी **सायं.** ५.४५ वा. पर्यंत राहील.
2. खालील नमूद पदांच्या लेखी परीक्षा दिनांक २५ **जानेवारी** २०१४ रोजी घेण्यात येतील. परीक्षेची वेळ व ठिकाण लेखी परीक्षा प्रवेश पत्रामध्ये दिनांक २१/०१/२०१४ रोजी कळविण्यात येईल.
3. परीक्षेचा दिनांक, लेखी परीक्षा, प्रवेश पत्र, मुलाखत पत्र, परीक्षेचा निकाल, अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे इत्यादीबाबत माहिती वेळोवेळी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. तेव्हा भरती प्रकीया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी वेळोवेळी वरील संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात.
4. भरण्यात येणा-या पदांची नावे, वेतनश्रेणी, पदसंख्या, आरक्षण व पदांसाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व अनुभव याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.
5. 

| अ. क्र. | पदनाम | पे बँड व ग्रेड वेतन | आवश्यक शैक्षणिक पात्रता व अनुभव | पद संख्या | आरक्षण | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अस्थिरोग तज्ञ | रु.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु.६६०० | 1. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस. व अस्थिरोग विषयातील एम.एस ही पदवी किंवा पदविका असणे आवश्यक.<br>2. शासकीय/ निमशासकीय/ खाजगी रुग्णालयातील अस्थिरोग विषयातील ५ वर्षाचा अनुभव<br>3. महाराष्ट्र मेडीकल कौन्सील कडील रजिस्ट्रेशन आवश्यक. | ०१ | अनु. जाती | -- |
| २. | भूलतज्ञ | रु.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु.६६०० | 1. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस. आणि एम.डी Aneaesthesia परीक्षा उत्तीर्ण किंवा Aneaesthesia पदविका उत्तीर्ण.<br>2. ५ वर्षाचा अनुभव.<br>3. महाराष्ट्र मेडीकल कौन्सील कडील रजिस्ट्रेशन आवश्यक. | ०१ | अनु. जमाती | -- |
| ३. | सर्जन | रु.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु.६६०० | 1. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.डी (जनरल सर्जरी)/एम.एस. परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. जनरल सर्जरी कामाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव.<br>3. महाराष्ट्र मेडीकल कौन्सील कडील रजिस्ट्रेशन आवश्यक. | ०२ | अनु. जाती-१<br>खुला-१ | |
| ४. | फिजिशियन | रु.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु.६६०० | 1. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील General Medicine विषयातील एम.डी. परीक्षा उत्तीर्ण.<br>2. ५ वर्षाचा अनुभव.<br>3. महाराष्ट्र मेडीकल कौन्सील कडील रजिस्ट्रेशन आवश्यक. | ०२ | अनु. जमाती-१<br>खुला-१ | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | क्ष किरण शास्त्रज्ञ | र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु.६६०० | 1. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील Radiology विषयातील एम.डी परीक्षा किंवा डी.एम.आर.डी. उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. किमान ५ वर्षाचा अनुभव.<br>3. महाराष्ट्र मेडीकल कौन्सील कडील रजिस्ट्रेशन आवश्यक. | ०१ | खुला | | |
| ६. | वैद्यकीय अधिकारी | र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु.५४०० | 1. मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी परीक्षा उत्तीर्ण व इंटर्नशिप पूर्ण केलेली असणे आवश्यक.<br>2. राज्य मेडीकल कौन्सिल कडील रजिस्ट्रेशन आवश्यक. | १७ | अनु.जाती | ०३ | पैकी महिला-१ |
| | | | | | अनु.जमाती | ०३ | पैकी महिला-१ |
| | | | | | भ.ज.(क) | ०१ | |
| | | | | | भ.ज.(ड) | ०१ | |
| | | | | | इमाव | ०२ | |
| | | | | | खुला | ०७ | पैकी महिला-२ माजी सैनिक -१ नि:समर्थ व्यक्ती (अपंग) – १ (partially Sighted) |

५.१ वरील प्रवर्गनिहाय आरक्षणाच्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता असून त्याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्तांना राहतील.

५.२ शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.एस.आर.व्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६ अ, दिनांक १६/०३/१९९९ अन्वये समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या सामाजिक आरक्षणातील उमेदवारांची निवड करण्यात येईल.

**६) वयोमर्यादा :-**

६.१ उपरोक्त सर्व पदांसाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकास किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहील. वैद्यकीय अधिकारी पदाकरीता कमाल वयोमर्यादा खुला प्रवर्गाकरीता ३३ वर्षे तर मागास प्रवर्गाकरीता ३८ वर्ष राहील तर शासन परिपत्रक क्र. एस.आर.व्ही-२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२, दिनांक १ नोव्हेंबर २००३ नुसार अस्थिरोग तज्ञ, भूलतज्ञ, सर्जन, फिजिशियन, क्ष-किरण शास्त्रज्ञ या पदांसाठी अर्ज करणा-या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.

६.२ प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त व नि:समर्थ व्यक्ती(अपंग) उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील.

६.३ माजी सैनिकांसाठी त्यांनी सैनिकी सेवेत व्यतित केलेला अखंड कालावधी हा त्यांच्या वयातून वजा करण्यात येईल तसेच त्यांना कमाल वयोमर्यदित ३ वर्षाची सवलत राहील.

६.४ स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य असल्यास वयाची कमाल मर्यादा ४५ व अंशकालीन उमेदवार असल्यास वयाची कमाल मर्यादा ४६ वर्षे राहील. खेळाडु यांच्यासाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

**७) शैक्षणिक अर्हता :-**

७.१. अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी जाहिरातीच्या दिनांकास, ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाची शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण केला असणे आवश्यक आहे.

**८) परीक्षा शुल्काबाबत :-**

८.१ वरील सर्व पदांसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रक्कम रु. ३००/- व मागासवर्गीय उमेदवारांनी रक्कम रु. १५०/- इतके परीक्षा शुल्क मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८ यांचे नावे बँक ऑफ बडोदाच्या कोणत्याही शाखेत संबंधित बँकेच्या कामकाजाच्या वेळेनुसार खाते क्रमांक ३१०६०२००००००८७ वर विहित चलनाव्दारे भरणे आवश्यक आहे.

८.२ बँकेत शुल्क चलनाव्दारे जमा केल्यानंतर बँक चलनावर Transaction ID/Journal Number नमूद करेल जो Transaction ID/Journal Number Online अर्जावर भरल्याशिवाय अर्ज स्वीकृत केला जाणार नाही.

८.३ मागासवर्गातील उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास अथवा त्यास खुल्या प्रवर्गातून अर्ज करावयाचा असल्यास त्यांनी खुल्या प्रवर्गाप्रमाणे रक्कम रु. ३००/- शुल्क भरावे व अर्जामध्ये खुल्या प्रवर्गामध्ये अर्ज केला आहे ,असे नमूद करावे

८.४ कोणत्याही परिस्थितीमध्ये सदर परीक्षा शुल्क परत केले जाणार नाही.

८.५ परीक्षा शुल्क भरल्याबाबतची बँक चलनाची पावती लेखी परीक्षा/मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

८.६ माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क माफ राहील.

८.७ परीक्षा शुल्क वर नमूद केल्याप्रमाणे फक्त बँक ऑफ बडोदा या बँकेमध्ये चलनाव्दारे जमा करावे. इतर स्वरुपात प्राप्त होणारे परीक्षा शुल्क स्वीकारले जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८.८ परीक्षा शुल्क दिनांक १८/०१/२०१४ रोजी संबंधित बँक कामकाजाचे वेळेनुसार दुपारी १.०० वा. पर्यंतच स्वीकारण्यात येईल.

**९) अर्ज सादर करणेबाबत आवश्यक सूचना :-**

९.१ उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी व नंतरच आपला अर्ज भरावा. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारले जातील.

९.२ Online अर्ज करण्यासंबंधीच्या सर्व सविस्तर सूचना www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्या सर्व सूचना उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचून त्या सूचनांचे अनुषंगाने भरावयाची संपूर्ण माहिती आपल्याकडे आहे किंवा नाही याची खात्री करुनच अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

९.३ उमेदवाराची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार आहे. उपरोक्त पदांसाठी विहित केलेले अर्ज www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०६/०१/२०१४ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून ते दि. १८/०१/२०१४ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत उपलब्ध होतील. अर्ज भरावयास सुरुवात करण्याअगादेर शुल्क संगणकीय चलनाव्दारे भरणे आवश्यक आहे. बँक चलनाचा नमुना www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यातील आवश्यक माहिती भरुन प्रिंट काढून घ्यावी व शुल्क नमूद केलेल्या बँकेत जमा करावे. बँकेत शुल्क चलनाव्दारे जमा केल्यानंतर बँक चलनावर Transaction ID/Journal Number नमूद करेल जो Transaction ID/Journal Number on Line अर्जावर भरल्याशिवाय अर्ज स्वीकृत केला जाणार नाही.

९.४ उमेदवारांनी शुल्क बँकेत चलनाव्दारे जमा केल्यानंतर www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरावा. अर्ज भरत असताना फोटो, स्वाक्षरी, बँक चलनाची प्रत स्कॅन upload करुन पुढे इतर आवश्यक माहिती अर्जामध्ये अचूक भरावी.

९.५ उमेदवारांनी सर्व माहिती भरल्यानंतर Preview वर Click करावे. यामुळे भरलेल्या अर्जाचे पुनर्विलोकन (Review) करता येईल. जर अर्जातील माहिती बदलावयाची असल्यास Next अथवा Preview बटन दाबून आपल्याला जी माहिती दुरुस्त करावयाची आहे, ती माहिती दुरुस्त करता येऊ शकेल.

९.६ पुनर्विलोकन (Review) नंतर सर्व माहिती बरोबर असल्यास Submit बटनवर Click करावे. त्यानंतर आपला अर्ज Submit होऊन आपल्याला त्याची प्रिंट आऊट काढता येईल.

९.७ पूर्णत: माहिती भरलेल्या अर्जाची प्रिंट आऊट काढून घ्यावी. प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी. कारण अर्जाची प्रिंट लेखी परीक्षा व मुलाखतीकरीता सोबत आणणे आवश्यक आहे.

९.८ इंटरनेटवर उपलब्ध होणारा अर्ज क्रमांक जपून ठेवावा. कारण परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करताना आपणांस प्राप्त होणारा अर्ज क्रमांक व आपली जन्मतारीख अचूक नमूद केल्यानंतरच आपले प्रवेशपत्र आपणांस डाऊनलोड करता येईल.

९.९ चुकीचा अर्ज क्रमांक व चुकीची जन्मतारीख नमूद केल्यास आपणांस प्रवेशपत्र डाऊनलोड करता येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी

९.१० अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस कागदपत्रांच्या छाननीशिवाय लेखी परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवार लेखी परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस/मुलाखतीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा/ मुलाखतीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांस संबधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

९.११ भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्यानुषंगाने होणाऱ्या बदलाबाबतची सर्व माहिती www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९.१२ शासकीय/निमशासकीय/महापालिका सेवेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी अर्ज करण्यापूर्वी कार्यालय प्रमुखाची परवानगी घ्यावी. सदर परवानगी घेतल्याबाबतचे आदेश मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

९.१३ विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणलीमध्ये स्वीकृत केला जाणार नाही.

९.१४ उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती बरोबर आहे असे गृहीत धरुन कोणत्याही टप्प्यावर पडताळणीच्या अधीन राहून अर्ज स्वीकृत करण्यात येतील. पात्र उमदेवाराची प्रत्यक्ष निवड करण्यापूर्वी करण्यात येणाऱ्या कागदपत्रे छाननीमध्ये अर्जातील माहिती खोटी, विसंगत असल्याचे स्पष्ट झाल्यास उमेदवार निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

९.१५ ऑनलाईन प्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार असल्यास भ्रमणध्वनी क्रमांक 9096173468 वर सकाळी १०.०० ते ५.४५ या वेळेत संपर्क साधावा. तथापि अर्ज भरण्यासंबंधी , प्रवेशपत्र उपलब्धतेसाठी उमेदवारांनी support@pcmc.applyjobz.com या ई-मेल आयडीवर ई-मेल पाठवल्यानंतर उमेदवारांना त्यांच्या अडचणीचे निराकरण करुन तसा SMS संदेश उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर किंवा मेल आयडीवर ई-मेल पाठवण्यात येईल. त्यासाठी उमेदवाराने अर्जामध्ये त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल इत्यादि माहिती भरणे अनिवार्य आहे.

**१०) लेखी परीक्षा – प्रवेशपत्र :-**

१०.१ जाहिरातीत नमूद पदांकरिता अर्ज केलेल्या लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र व सूचनापत्र www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर दिनांक **२१/०१/२०१४** रोजी टाकण्यात येतील. (अपलोड करण्यात येतील) उमेदवारांनी लेखी परीक्षा प्रवेशपत्र व सुचनापत्र स्वत: संकेतस्थळावरुन काढुन घ्यावे.

१०.२ ज्या उमेदवाराचे लेखी परीक्षा प्रवेशपत्र व सूचनापत्र संकेत स्थळावरुन उपलब्ध होणार नाहीत. त्यांनी दिनांक **२३/०१/२०१४** पूर्वी मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडे प्रवेशपत्र व सुचनापत्र मिळण्याबाबत अर्ज करावा. त्यांना प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथुन लेखी परीक्षा प्रवेशपत्र व सुचनापत्र उपलब्ध करुन देण्यात येईल.

**११) मागासवर्गीय व समांतर आरक्षणाबाबत :-**

११.१ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दिनांक १८/०५/२०१३ व शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दिनांक ३०/०७/२०१३ नुसार मागासवर्गीय प्रवर्गातील पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या जातीचे सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास उमेदवाराची अंतिम निवड झाल्यानंतर ६ महिन्याच्या आत जात पडताळणी समितीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील, अन्यथा उमेदवाराची नियुक्ती रद्द केली जाईल.

११.२ महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती(विमुक्त जमाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०१/२००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्त्व वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., इ.मा.व. आणि वि.मा.प्र. यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमदेवारांनी ते उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे चालू वर्षाचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र लेखी परीक्षेच्या/मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा सदर उमेदवार आरक्षणाचा लाभ घेण्यास अपात्र ठरतील.

११.३ खुला प्रवर्ग, इतरमागास, विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती(क), भटक्या जमाती(ड), विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांनी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर)मध्ये मोडत नसल्याबाबतचे शासनाने जाहिर केलेल्या सक्षम अधिका-याचे चालू वर्षाचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र लेखी परीक्षा व मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा सदर उमेदवार महिला आरक्षणाचा लाभ घेण्यास अपात्र ठरतील.

**१२) लेखी परीक्षेचे स्वरुप :-**

१२.१ लेखी परीक्षा ही त्या पदाची शैक्षणिक अर्हता व पदाच्या कामाचे स्वरुप यांचेशी संबंधित राहील. उपरोक्त पदाकरीता १८० गुणांची लेखी परीक्षा व २० गुणांची मौखिक परीक्षा घेण्यात येणार आहे.

१२.२ लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाची असेल. तसेच ओएमआर उत्तरपत्रिका स्वतंत्र देण्यात येईल. त्याचा नमुना संकेतस्थळावर ठेवणेत आला असून, उत्तरपत्रिकांची तपासणी ओएमआर मशीनवर करणेत येणार आहे.

१२.३ समान गुण असणाऱ्या उमेदवारांचा गुणवत्ता क्रम, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रनिम/२००७/प्रकरण क्र. ४६/७/१३ अ,दि. २७/०६/२००८ मधील मुद्दा क्र.६ मध्ये दिलेल्या निकषावर लावला जाईल.

१२.४ गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणाच्या ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

**१३) निवड पध्दत :-**

१३.१ जाहिरातीमध्ये नमूद पदांकरिता उमेदवारांची निवड लेखी परिक्षा व मुलाखत या दोन्हीमध्ये मिळणाऱ्या एकूण गुणाच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यात येईल.

१४) इतर अटी व शर्ती :

१४.१ शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दि. २७ जून २०११ नुसार मुलाखतीच्या वेळी उमेदवारांने अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) अथवा महाराष्ट्र राज्यात जन्म झाला असल्याची नोंद असणारा जन्माचा दाखला अथवा शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.

१४.२ शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशासन २०००/प्र.क्र.६१/२०११/३९, दिनांक १९ मार्च २००३ अनुषंगिक सुधारित शासन निर्णयानुसार उपरोक्त पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी/वापराबाबतची शासनाने विहित केलेले प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल. शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि) विभाग, शा.नि.क्र. मातस २०१२/प्र.क्र.२०१२/प्र.क्र.२७७/३९, दि. ०४/०२/२०१३ अन्वये शासनाने विहित केलेले संगणक अभ्यासक्रम/माहिती तंत्रज्ञानविषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल

१४.३ निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००५/सेवा-४, दि. ३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृती योजना ( Defined contribution Pension System) लागु राहील.

१४.४ दिनांक ०१/११/२००५ पूर्वी शासकीय/निमशासकीय सेवेत दाखल झालेल्या उमेदवाराची सदर पदासाठी निवड झाल्यास संबंधित शासकीय/निमशासकीय कार्यालयांनी, अशा उमेदवाराच्या सेवानिवृत्ती वेतन अंशदान (पेन्शन कॉंट्रयुब्युशन) व रजा वेतन अंशदान (लिव्ह सॅलरी कॉंट्रयुब्युशन) ची रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग केल्यास अशा कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ नुसार निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

१४.५ लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र, लेखी परीक्षेचा निकाल, मुलाखतीचा दिनांक व निवड यादी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डावर तसेच www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

१४.६ उमेदवारांने यापूर्वी जरी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालय /एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय/जिल्हा सैनिक कार्यालय व जिल्हा पुनर्वसन कार्यालय येथे नोंदविले असेल व त्यांचे नावाची संबंधित कार्यालयाकडून शिफारस करण्यात आली असली, तरी त्यांनी या पदांचा भरतीसाठी स्वतंत्रपणे Online अर्ज करणे आवश्यक आहे.

१४.७ महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. एस.आर.व्ही -२०००/प्रक्र१७/२०००/१२,दि. ०१/०७/२००५ अन्वये दि. २८/०३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही. तसे विहित नमुन्यात र.रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले प्रतिज्ञापन नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

१४.८ नि:समर्थ व्यक्ती(अपंग) व्यक्तीसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी मा.जिल्हा शल्य चिकित्सकांकडील नि:समर्थ व्यक्ती(अपंग)चे प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच नि:समर्थ व्यक्ती(अपंग) प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे.

१४.९ महिला उमेदवार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचीत केलेल्या राजपत्राची साक्षांकीत प्रत लेखी परीक्षा/मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१४.१० उमेदवाराने तो कोणत्या प्रवर्गातून अर्ज करीत आहे, त्याचा स्पष्ट उल्लेख अर्जात करावा. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास अथवा उमेदवार ज्या मागासप्रवर्गातील आहे, त्या प्रवर्गासाठी प्रस्तुत भरतीमध्ये आरक्षित पदे नसल्यास, तो खुल्या प्रवर्गातून अर्ज करू इच्छित असेल तर त्याने अर्जामध्ये तसे स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे.

१४.११ पात्र उमेदवारांना मुलाखतीस बोलावल्यानंतर कागदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र(अद्ययावत नोंदणी नुतनीकरणासह) याबाबतची मूळ कागदपत्रे व त्याची प्रत्येकी एक साक्षांकित प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

१४.१२ मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी ठेवण्यात आलेल्या गुणांकरीता तपासावयाच्या मूळ कागदपत्रांच्या अर्हतेत मूळ कागदपत्रांशिवाय आवश्यक असेल तसे प्रकरणनिहाय खालील कागदपत्रे तपासणी समितीकडून तपासले जातील.

1. नावात बदल केल्याबाबतचे प्रमाणपत्र
2. छोटे कुंटुंबाचे प्रमाणपत्र
3. संगणक अर्हता प्रमाणपत्र

१४.१३ निवड प्रक्रिया सुरु झालेनंतर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व मुलाखतीच्या वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती कोणत्याही टप्प्यांवर रद्द करण्यात येईल.

१४.१४ उपरोक्त रिक्त पदांसाठी प्राप्त होणारे अर्ज विचारात घेऊन लेखी परीक्षा व मुलाखत घेण्यात येईल अथवा केवळ मुलाखती घेण्यात येतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१४.१५ पात्र उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी/मुलाखतीसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

१४.१६ सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना शव विच्छेदन (Post Mortem) चे काम करावे लागेल.

१४.१७ भरतीप्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार महापालिका आयुक्त यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित करण्याचे अधिकार आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

*सही/-*
(*डॉ. श्रीकर परदेशी*)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

*सही/-*
सहाय्यक आयुक्त(प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक प्रशा/१/कावि/ ०३/२०१४
दिनांक ०४/०१/२०१४